महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९५५ /२०२३ दि. २५/०९/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** भिवंडी शहरात दि. २९/०९/२०२३ रोजी (चंद्र दर्शनानुसार एक दिवस मागे किंवा पुढे) **'ईद–ए–मिलाद'** मुस्लिम बांधवांचा सण साजरा होणार आहे. त्यानिमित्त भव्य मिरवणूक काढण्यात येवून मिरवणुकीमध्ये मुस्लिम बांधव मोठया प्रमाणात सामील होणार आहेत. सदर दिवशी वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) वाडा रोड मार्गे भिवंडी शहराकडे येणा–या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना अंबाडी नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची जड अवजड वाहने ही अंबाडी नाका येथून राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ने अथवा बृहन्मुंबई महानगरपालिका पाईपलाईन मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) वाडा रोडने नदीनाका मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना पारोळ फाटा (नदीनाका) येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची हलकी वाहने पारोळ फाटा येथून उजवीकडे वळून खोणीगांव, तळवली फाटा, कांबारोड मार्गे वसई रोड येथून डावीकडे वळण घेवून कारीवली मार्गे अथवा विश्वभारती फाटा येथून डावीकडे वळण घेवून गोरसईगांव मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) वडपा चेकपोस्ट मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना एस. टी. बसेससह धामणगांव, जांबोळी पाईपलाईन नाका व चाविंद्रा नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सदरची सर्व प्रकारची वाहने धामणगांव पाईपलाईन येथे उजवीकडे वळण घेवून पाईपलाईन मार्गे वाडयाकडे व पुढे इच्छित स्थळी जातील.

ब) तसेच एस. टी. बसेस आपले प्रवासी चाविंद्रा जकात नाका या ठिकाणी उतरवतील व तेथून प्रवाशी घेवून बस वळवून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) ठाणे, कल्याण कडुन जुना ठाणे आग्रा रोडने वाडा बाजूकडे व चाविंद्रा मार्गे नाशिकडे जाणा–या सर्व वाहनांना बागेफिरदोस मस्जिद पेट्रोल पंप येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने बागेफिरदोस पेट्रोल पंप येथे उजवीकडे वळण घेवून नागाव रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) रांजनोली चौकातून भिवंडी शहरात येणा–या एस.टी., के.डी.एम.टी. बसेस, जड अवजड वाहने, कार, रिक्षा, दुचाकी, मध्यम व हलकी वाहनांना रांजनोली नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सदरची एस.टी., के.डी.एम.टी. बसेस, रिक्षा या रांजनोली नाका येथे प्रवाशी उतरवतील व तेथूनच प्रवाशी भरुन इच्छित स्थळी जातील

ब) तसेच जड–अवजड, मध्यम व हलकी वाहने रांजनोली नाका येथून वळसा घेवून मुंबई–नाशिक बायपास हायवे वरील मानकोली नाका येथून अंजुर फाटा किंवा वसई रोड किंवा ओवळी खिंड येथून ओवळी गांव, ताडाळी जकात नाका, कामतघर किंवा पाईपलाईन रोडने इच्छित स्थळी जातील.

**नो–पार्किंग झोन–** ६) कॉटरगेट मस्जिद–रामभवन हॉटेल–चॉदतारा मस्जिद, बुबेरे हॉटेल–पटेल मस्जिद उजव्या बाजुने पांजरपोल चौक मार्गे उजव्या बाजूस वळून पंडीत जवाहरलाल चौक (वंजारपाटी नाका)–ममता हॉस्पिटलच्या बाजूने डावीकडे–मामा भांजा दर्गा पावेतो या मिरवणूक मार्गावर रस्त्याच्या दोन्ही बाजूस सर्व प्रकारच्या वाहनांना वाहने पार्क करण्यास मनाई करण्यात येत आहे.

(क्र.मा.प.)

सदरची अधिसूचना हि **''ईद–ए–मिलाद''** या दिवशी दि. २९/०९/२०२३ रोजी (चंद्र दर्शनानुसार एक दिवस मागे किंवा पुढे) भिवंडी शहरामध्ये रस्त्यावर दुपारी १२.०० ते २४.०० वाजे पावेतो किंवा मिरवणूक संपेपर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसूचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, निजापूर शहर महानगरपालिका, भिवंडी/बृहन्मुंबई.
मा. पोलीस अधिक्षक, पालघर, ठाणे ग्रामीण.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा. ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, भिवंडी.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी.
नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी, ठाणे.

**प्रत**:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/– सदरची अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सहायक पोलीस आयुक्त, भिवंडी वाहतूक विभाग, ठाणे शहर.
पो.निरी. भिवंडी, नारपोली, कोनगांव वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

CS CamScanner